शा.फो.झि.मु.,पुणे-सिए/२५०-(१००पुस्तके)-९-०५

क्रमांक **003**

सत्यमेव जयते

## नोंदणी प्रमाणपत्र

**संस्था नोंदणी अधिनियम, १८६०**

**(१८६० चा अधिनियम २१)**

नोंदणी क्रमांक महा. 1970/2011/पुणे.
दि. 17/11 /11/पुणे.

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, श्रीनाथ म्हस्कोबा शैक्षणिक संस्था दौंड
मु. पिलाणवाडी पो. राहु ता. दौंड जि. पुणे

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरीत्या नोंदणी करण्यात आली. श्री लक्ष्मण पांडुरंग कदम

तारीख : 17.11.2011 २० रोजी माझ्या सहीनिशी दिले.

Asstt. Registrar of Society
Pune Region, Pune

सहाय्यक संस्था निबंधक
संस्थांचे सहायक निबंधक,
पुणे विभाग, पुणे
विभाग.

No : 003

# Registration Certificate

**SOCIETIES REGISTRATION ACT, 1860**

( 21 of Act 1860 )

Registration No
Maha 1970/2011/Pune
Date 17/11 /11/ Pune

This is to certify that Shrinath Mhaskoba Shaikshanik Sanstha, Daund At. Pilanwadi Post. Rahu Tal. Daund, Dist. Pune has been registered on date below properly according to SOCIETIES REGISTRATION ACT, 1860 ( 21 of Act 1860 )
Shri Lakshman Pandurang Kadam

Date : 17.11.2011 given with my signature

Assistant Societies register

Pune Division, Pune

प्रा. अनिरुद्ध गोरे

MEMBER, TRANSLATION PANEL BY MAHARASHTRA GOVT. G.R. No. PANEL2017/ C.No.83/Languge-2 Dt. 25/01/2018

| Chairman | Vice-chairman | Secretary |
|---|---|---|
| Shri Laxman Pandurang Kadam | Shri Dnyaneshwar Tukaram Kadam | Shri Pandurang Tukaram Kadam |

सत्यमेव जयते

21

# नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये पुणे विभाग पुणे येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव "श्री नाथ म्हस्कोबा शैक्षणिक संस्था" मु. पिलाणवाडी पो. राहु ता. दौंड जि. पुणे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक F-37433 (पुणे)

श्री. पांडुरंग लक्ष्मण कदम यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक 28.03.२०१२ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

Deputy Charity Commissioner * Pune *

सही सह धर्मादाय आयुक्त

पदनाम पुणे विभाग, पुणे

[Vishesh-Gh. A. ( Mum. Saa. Vi. ) 2. pra

# Registration Certificate

This is to certify that the Public Trust described below, has been properly registered today, according to Bombay Public Trust Act, 1950 ( No 29 of Mumbai Act, year 1950 ) at Public Trust Registration Office in Pune Division, Pune.
Name of the Public Trust is Shrinath Mhaskoba Shaikshanik Sanstha
At. Pilanwadi Post. Rahu Tal. Daund, Dist. Pune
Serial No in Public Trust Registration Book F-37433 ( Pune )
Certificate is given to Shri. Laxman Pandurang Kadam.
Today on Date 28.03.2012 with my signature.

Signature

Post – Assistant Charity Commissioner,
Pune Division, Pune

| Chairman | Vice-chairman | Secretary |
|---|---|---|
| Shri Laxman Pandurang Kadam | Shri Dnyaneshwar Tukaram Kadam | Shri Pandurang Tukaram Kadam |

प्रा. अनिल गोरे

MEMBER, TRANSLATION PANEL BY MAHARASHTRA GOVT. G.R. No. PANEL2017/ C.No.83/Languge-2 Dt. 25/01/2018

परिशिष्ट ''ब''

या संस्थेचे ज्ञापन (मेमोरंडम ऑफ असोसिएशन)

१) संस्थेचे नांव :- **श्रीनाथ म्हस्कोबा** ग्रा. **पिलाणवाडी, दौंड,**

२) संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता:- **मु.पिलाणवाडी, पो. राहु, ता. दौंड, जि.पुणे**

३) संस्थेचे कार्यक्षेत्र :- **महाराष्ट्र राज्य असे राहील.**

४) संस्थेचे ध्येय व उद्देश :-

हा न्यास आम्ही परिसरातील अडीअडचणी दूर व्हाव्यात, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक गरजांची पुर्ती व्हावी यासाठी हा न्यास निर्माण केलेला आहे.

**संस्थेचे उद्देश :-**

१) शिक्षणाच्या विकासासाठी व प्रचारासाठी उपयुक्त अशा सर्व गोष्टी करणे, शिक्षणाच्या माध्यमातून विज्ञान, वाडमय, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य करणे व विविध कला व त्याव्दारे योग्य ते उपयुक्त ज्ञान जनतेस देणे. शिक्षणाचा प्रसार, प्रचार करण्यासाठी बालवाडी, प्राथमिक शाळा, विद्यालय, महाविद्यालये, शैक्षणिक संशोधन केंद्रे, ग्रंथालये, निरक्षता कमी करण्यासाठी प्रौढ शिक्षण केंद्र चालविणे, वसतीगृहे, आदिवासींसाठी विकास केंद्रे, आश्रम शाळा सोय करणे, व्यवसायिक शिक्षण तसेच संगणक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु करणे, विकास कार्यक्रम, समाज व्यसन मुक्ती कार्यक्रम इ. उपक्रम आयोजन करणे. निसर्गोपचार केंद्र सुरु करणे तसेच प्रचार व प्रसार करणे, वैद्यकीय महाविद्यालय, उच्च तंत्र व अभियांत्रिकी व्यवसाय महाविद्यालय, शेती महाविद्यालय सुरु करणे. पर्यावरण संवर्धन करणे, अपंगासाठी स्वतंत्र शैक्षणिक उपक्रम स्थापन करणे, त्यांना वसतीगृह व बोर्डींगची सोय करणे. आयुर्वेदाचे महत्त्व समाजाला पटवून देणे वन औषधी वनस्पतीची लागवड करणे व त्यांचे संशोधन करणे व तज्ञांच्या मदतीने उपचार करणे. महाराष्ट्र शासन व त्याचप्रमाणे भारत सरकार यांचे शैक्षणिक योजनांचा प्रचार व प्रसार करणे

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम | श्री. ज्ञानेश्वर तुकाराम कदम | श्री. पांडुरंग तुकाराम [illegible] |

Asst. Charity Commissioner Pune

२) आर्थिक दुष्टया कमकुवत मुला मुलींच्या शैक्षणिक विकासासाठी शालय उपयोगी साहित्य उदा. वह्या पुस्तके इत्यादी साहित्य पुरविणे, कार्यक्षेत्रातील गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी विविध आरोग्य शिबीरांचे आयोजन करणे, व्यसनमुक्ती केंद्र सुरु करणे, व्यसनमुक्ती कार्यक्रम, अंधश्रध्दा निर्मूलन, साक्षरता मोहिम, तसेच दारुबंदी प्रचार व प्रसार कार्यक्रम आयोजित करणे, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रिडा, कला, युवा समाजकल्याण सल्लागार बोर्ड, आरोग्य कृषी विभागाच्या कल्याणकारी योजनीची माहिती देणे व उपक्रम राबविणे, महिला निराधार व निरश्रीत केंद्र, ग्रामीण महिला केंद्र, स्त्री आधार केंद्र, शिशु गृह नर्सिंग होम, नर्सिंग कोर्सेस, मॉंटेसरी, सी.टी.सी. कोर्सेस. इ. चालविणे, महिला व बाल कल्याण विभागांच्या, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कल्याणकारी योजनेचा प्रचार व प्रसार करणे, महिलांना शिवणकलेचे शिक्षण व प्रशिक्षण देणे त्यासाठी शिवण कला वर्ग चालविणे. कायदे विषयक मोफत सल्ला केंद्र सुरु करणे, समाजामध्ये नागरिकांची कर्तव्य या विषयी परिसंवाद आयोजित करणे व त्याची जागृती करणे. त्याचप्रमाणे आरोग्य शिक्षण,मानवी अधिकार समाजकल्याण याचा प्रचार व प्रसार करणे.

३) नैसर्गिक आपत्तीकाळी गरजू लोकांना मदत देणे, नैसर्गिक आपत्तीच्या प्रकार व तीव्रतेवर संस्था सदस्य विचार विनिमय करुन निर्णय घेतील. संत महात्मा, अपंग व निराधार, दिन दु:खी, वृध्द यांचे संगोपन करणे, शिक्षणाच्या माध्यमातून मानव जाती हितार्थ कार्य करणे, भारतीय संस्कृती व देशाच्या सर्वांगीन प्रगतीसाठी कार्य करणे, भारतीय नागरीकांच्या आरोग्य, शिक्षा, [illegible] व संस्कृतीक सुधारणेसाठी प्रयत्न करणे.

४) ग्रामीण व शहरी भागात वैद्यकीय सेवा व सुविधा उपलब्ध करुन देणे, त्याचबरोबर रुग्णवाहिका सेवा, शव वाहिका सेवा, उपलब्ध करुन देणे, कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा प्रसार करणे, आरोग्य केंद्र चॅरिटी हॉस्पिटल, फिरते रुग्णालय, टेन बेड हॉस्पीटल इ. चालविणे, वैद्यकीय संशोधन केंद्र, नर्सिंग कोर्सेस, नर्सिंग होम, इ. चालविणे व त्या संदर्भात सेवा सोयी उपलब्ध करुन देणे.

५) एड्स विषयी समाजात जनजागरण करणे एड्स निर्मुलन व नियंत्रण कार्यक्रमाचा प्रसार व प्रचार करणे, क्षय रोग निदान, व उपचार शिबीरे, आरोग्य शिबीरे, रक्तदान शिबीरे, व रोग निदान, व उपचार शिबीरे,

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| --- | --- | --- |
| श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम | श्री. ज्ञानेश्वर तुकाराम कदम | श्री. पांडुरंग तुकाराम कदम |

Charity Commissioner Pune

शैल्यचिकित्सक शिबीरे नेत्र चिकित्सा शिबीरे, युवक व युवती नेतृत्व शिबीरे, व्यक्तीमत्त्व विकास शिबीरे, स्वयंरोजगार प्रशिक्षक शिबीरे, सांस्कृतिक व क्रीडा विषयक शिबीरे इ. शिबीरांचे आयोजन करणे वगैरे.

६) वैज्ञानिक खेळणी, पोस्टर प्रदर्शन, स्वाक्षरी, शो चर्चासत्रे इ. चे ज्ञान देऊन मुलांमध्ये विज्ञान प्रसार करणे, निसर्गातील सर्व स्त्रोतांचा उपयोग करुन जनजागृती करणे.

७) व्यक्तीमत्व विकास, शारिरीक व मानसिक विकासासाठी सहली शिबीरे व्याख्याने, ध्यानशिबीरे, प्राणायम, निसर्ग उपचार, यांचे आयोजन करुन मन व आरोग्य सुधारणे करणे.

८) सर्व रोग निदान व उपचार शिबीरे, आरोग्य, रक्तदान शिबीरे आयोजित करणे.

९) युवकामध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी यासाठी क्रिडा व व्यायाम शाळा स्थापन करणे, शास्त्रोक्त व्यायामाचे शिक्षण देणे, ~~व नवी व्यायामशाळा बांधणे व व्यायाम साहित्य खरेदी~~ करणे, विविध खेळाच्या स्पर्धा भरविणे, शिबीरांचे आयोजन करणे. वृध्दाश्रमासाठी शासनाच्या विविध योजना अंमलात आणणे व वृध्दाश्रम सुरु करणे.

१०) निरनिराळे राष्ट्रीय उत्सव व सण साजरे करणे, उदा. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, महाराष्ट्र दिन तसेच थोर व्यक्तींची पुण्यतिथी साजरी करणे व त्यांच्या थोर तत्वज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे तसेच सार्वजनिक गणेशोत्सव, दुर्गोत्सव, शिवजयंती, इ. उत्सव साजरे करणे व संस्कारवर्ग सुरु करणे.

११) नृत्य, नाटय, संगित ललीत कला, संस्कृती व साहित्यक्षेत्रात कार्यक्रमाचे आयोजन करणे, कला, हस्तकला, संगित, नृत्य यावर प्रशिक्षण देणे.

१२) भारताच्या उच्च व वैविध्यपुर्ण परंपरेचा परिचय करुन देणे, सांस्कृतिक कार्याविषयी परिषद, चर्चासत्रे सर्वेक्षण पथदर्शक प्रकल्प इ. आयोजन करणे.

१३) कायद्याच्या चौकटीत बसतील असे वरील उद्देशास पुरक विविध उपक्रम संस्थेच्या वतीने यशस्वीरित्या आयोजित केले जातील.

१४) सदरहू संस्थेचे नियम व नियमावलीनुसार ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेची जबाबदारी व व्यवस्था सोपविली आहे अशा कार्यकारी मंडळातील

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम | श्री. ज्ञानेश्वर तुकाराम कदम | श्री. पांडुरंग तुकाराम कदम |

पहिल्या मंडळातील संपूर्ण नांवे व पत्ता, वय, व्यवसाय, पद व राष्ट्रीयत्व पुढीलप्रमाणे राहतील.

| अ. क्र. | सभासदाचे नांव | वय | व्यवसाय | पद | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम<br>रा.मु. पिलाणवाडी, पो. राहु, ता. दौंड, जि.पुणे | २८ | शेती | अध्यक्ष | भारतीय |
| २. | श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम<br>रा.मु. पिलाणवाडी, पो. राहु, ता. दौंड, जि.पुणे | ४५ | शेती | उपाध्यक्ष | भारतीय |
| ३. | श्री. पांडुरंग तुकाराम कदम<br>रा.मु. पिलाणवाडी, पो. राहु, ता. दौंड, जि.पुणे | ६५ | शेती | सचिव | भारतीय |
| ४. | श्री. राजेंद्र विलास कदम<br>रा.मु. पिलाणवाडी, पो. राहु, ता. दौंड, जि.पुणे | ३२ | शेती | कोषाध्यक्ष | भारतीय |
| ५. | सौ. स्वाती लक्ष्मण कदम<br>रा.मु. पिलाणवाडी, पो. राहु, ता. दौंड, जि.पुणे | २७ | शेती | सदस्य | भारतीय |
| ६. | श्री. नवनाथ विठ्ठल कदम<br>रा.मु. पिलाणवाडी, पो. राहु, ता. दौंड, जि.पुणे | २७ | शेती | सदस्य | भारतीय |
| ७. | श्री. संजय विलास कदम<br>रा.मु. पिलाणवाडी, पो. राहु, ता. दौंड, जि.पुणे | २३ | शेती | सदस्य | भारतीय |

६) वरील आम्ही सर्व आम्हां सर्वांची **श्रीनाथ म्हस्कोबा** **पिलाणवाडी, दौंड, पत्ता : मु.पिलाणवाडी, पो. राहु, ता. दौंड, जि.पुणे** या नांवाची संस्था स्थापन करु इच्छितो व संस्था नोंदणी अधिनियम सन १८६० अन्वये संस्था नोंदवू इच्छितो म्हणून आम्ही एकत्र येवून आज दिनांक 23/07/2019 रोजी या ज्ञापनावर सह्या करीत आहोत.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिन |
| श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम | श्री. ज्ञानेश्वर तुकाराम कदम | श्री. पांडुरंग तुकाराम कदम |

(5)

| अ.क्र. | सभासदाचे नांव | सही |
|---|---|---|
| १. | श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम | LKadam |
| २. | श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम | DKadam |
| ३. | श्री. पांडुरंग तुकाराम कदम | P.T.Kadam |
| ४. | श्री. राजेंद्र विलास कदम | R.V.KADAM |
| ५. | सौ. स्वाती लक्ष्मण कदम | स्वाती लक्ष्मण कदम |
| ६. | श्री. नवनाथ विठ्ठल कदम | NKadam |
| ७. | श्री. संजय विलास कदम | S.V. Kadam |

वरील सर्व इसमांना मी ओळखत असून त्यांनी माझे समक्ष या ज्ञापनावर सहया केल्या आहेत त्या मी ओळखतो.

स्थळ :- पुणे
दिनांक :- 23/12/2011

Adv. M.D. Phool
Mauley
pune

## प्रमाणपत्र

यावरुन असे प्रमाणित करण्यात येते की, आम्ही सर्वजण असे कथन करतो की, **श्रीनाथ म्हस्कोबा** श्रीनाथ म्हस्कोबा **, पिलाणवाडी, दौंड, पत्ता : मु.पिलाणवाडी, पो. राहु, ता. दौंड, जि.पुणे** या नावाची अथवा या नावात साम्य असलेली दुसरी कोणतीही संस्था आमचे उत्तम माहितीनुसार व समजुतीनुसार या भागात किंवा परिसरात अस्तित्वात नाही किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये संस्था नोंदविण्यात आलेली नाही.

स्थळ :- पुणे
दिनांक :- 23/12/2011

**अध्यक्ष**

LKadam

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| **श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम** | **श्री. ज्ञानेश्वर तुकाराम कदम** | **श्री. पांडुरंग तुकाराम कदम** |

## परिशिष्ट "क"

### संस्थेचे नियम व नियमावली

संस्थेचे नांव :- श्रीनाथ म्हस्कोबा [illegible], पिलाणवाडी, दौंड,

संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता:- मु.पिलाणवाडी, पो. राहु, ता. दौंड, जि.पुणे

**संदर्भिय शब्दांची व्याख्या :-**

अ) संस्था :- संस्था म्हणजे संस्था नोंदणी अधिनियम सन १८६० व मु.सा. वि. व्य. अधिनियम सन १९५० अन्वये नोंदविण्यात येणारी संस्था.

२) संस्थेचे कार्यक्षेत्र :-

महाराष्ट्र राज्य.

३) हिशोबाचे वर्ष :-

संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

४) सभासदत्व व त्यांची नोंदणीची पध्दत.

सभासद :-

सभासदत्वांची तरतुद :-

कोणताही सज्ञान भारतीय व्यक्ती जिला / ज्याला या संस्थेचे नियम मान्य आहेत अशा व्यक्तीने विहित नमुन्यात अर्ज केल्यानंतर व ठराविक फी भरल्यानंतर व अशा अर्जांचा कार्यकारी मंडळात स्वीकार केल्यानंतर व मंजूरी दिल्यानंतर सदरील व्यक्तीस संस्थेचे सदस्यत्व प्राप्त होईल.

५) सभासदांचे प्रकार :-

संस्थेच्या प्रथम कार्यकारी मंडळातील सर्व पदाधिकारी व सदस्य हे आजीव सभासद असतील.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम | श्री. ज्ञानेश्वर तुकाराम कदम | श्री. पांडुरंग तु[illegible] |

Asst. Charity Commissioner Pune



**अ) साधारण सभासद:-**

वार्षिक रु. २५/- वर्गणी आर्थिक वर्ष सुरु झाल्यानंतर एक महिन्याच्या आत रितसर पैसे भरून साधारण सभासद होता येईल.

**ब) आजीव सभासद :-**

रु. १००/- किंवा त्यापेक्षा अधिक वर्गणी एकाच वेळी देऊन वर्गणी देणाऱ्याच्या इच्छेनुसार व कार्यकारी मंडळाच्या मान्यतेने वर्गणीदारास आजीव सभासद होता येईल. संस्थेचे संस्थापक सदस्य हे आजीव सभासद असतील.

६) **सभासदाचे सदस्यत्व रद्द होणेबाबत :-**

१. सभासद फौजदारी गुन्ह्याखाली शिक्षेस पात्र झाल्यास.

२. त्याच्याकडून नैतिक अध:पात घडल्यास.

३. एखादया सदस्याकडून किंवा पदाधिकाऱ्याकडून संस्थेच्या हिताविरोधात कार्य व वर्तन होत असेल व ते अध्यक्षांच्या निदर्शनास आल्यास सदरील पदाधिकारी व सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात येईल.

४. सतत तीन मिटींगला गैरहजर राहिल्यास सदस्यत्व रद्द करण्यात येईल.

७) **सर्वसाधारण सभा व तिचे अधिकार व कार्ये :-**

१. सर्वसाधारण सभा ही दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांच्या आत घेतली जाईल. ही सभा सर्वश्रेष्ठ व अंतीम निर्णय देणारी सभा असेल.

२. या सभेत सर्व प्रकारचे सभासद भाग घेऊ शकतील.

३. कार्यकारी मंडळाने चालविलेल्या कामावर नियंत्रण ठेवणे.

४. वार्षिक हिशोब मंजूर करणे.

५. पुढील वर्षाचे नवीन अंदाजपत्रक तयार करणे व मंजूर करणे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम | श्री. ज्ञानेश्वर तुकाराम कदम | श्री. पांडुरंग तुकाराम कदम |

(12)



६. वेळेवर अध्यक्षांचे परवानगीने येणारे ठराव सभेसमोर मांडून मंजुर अगर नामंजुर करणे.

७. संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असल्यास सात दिवसांच्या आत कार्यकारी मंडळांच्या विनंतीवरुन सभा आयोजित केली पाहिजे.

८. **सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या :-**

सार्वसाधारण सभेसाठी १५ दिवस अगोदर पोस्टाने अथवा समक्ष बजावून नोटीस काढण्यात येईल. तिथे अशी सभा ज्या तारखेस ज्यावेळी व जेथे घेण्यात येईल ती तारीख वेळ व जागा व सदर सभेत करण्यात येणारे कामकाज निर्दिष्ट करण्यात येईल व सदरची नोटीस संस्थेच्या कार्यालयात लावली जाईल. सर्वसाधारण सभेचा कोरम पूर्ण होण्यासाठी सर्व प्रकारच्या सभासदाचे ३/४ उपस्थिती असणे आवश्यक आहे. जर सभासदांच्या सभेच्या नोटीसमध्ये असा उल्लेख असला तरीही आवश्यक कोरम पूर्ण न झाल्यास त्या ठिकाणी अर्ध्या तासानंतर तहकुब झालेली सभा होईल. नंतर या सभेस कोरमची आवश्यकता नाही.

९) **विशेष सर्व साधारण सभा व तिचे कार्य :-**

कार्यकारी मंडळास सर्व सभासदांपुढे एखादी महत्वाची गोष्ट ठरवावयाची असल्यास अगर एखाद्या विशेष प्रसंगी सर्वसाधारण सभा बोलविली जाईल त्यावेळी वार्षिक सर्वसाधारण सभेचे सर्व नियम पाळण्यात येतील. सभेच्या पटावरील ३/४ सभासदांनी लेखी अर्ज केल्यास जादा सर्वसाधारण सभा अध्यक्षांनी बोलवली पाहीजे.

१०) **संस्थेचे कार्यकारी मंडळातील पदाधिकारी व त्यांची रचना :-**

संस्थेचे कार्यकारी मंडळ हे एकूण कमीत कमी ७ व जास्तीत जास्त ११ सभासदांचे राहील. सदरील संस्थेचे कार्यकारी मंडळ हे एकूण ७ सदस्यांचेच

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम | श्री. ज्ञानेश्वर तुकाराम कदम | श्री. पांडुरंग तुकाराम कदम |

राहील त्यामध्ये अध्यक्ष-१, उपाध्यक्ष-१, सचिव-१, खजिनदार-१, व उर्वरित सदस्य राहतील. पदाधिकाऱ्यांची निवडणुक कार्यकारी मंडळातील सभासदामधून केली जाईल, अध्यक्ष उपाध्यक्ष, सचिव व खजिनदार ही पदे संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या अंतर्गत मिटींगमध्ये ठरवले जातील. सदर कार्यकारणी ही तीन (३) वर्षाची असेल.

११) **कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पध्दत :-**

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा तीन वर्षाचा राहील. सदर तीन वर्षांनी संस्थेच्या एकूण मतदारांची यादी तयारी करुन सर्वसाधारण सभा बोलविण्यात येईल व सभेस कार्यकारी मंडळाची निवड लोकशाही पध्दतीने करतील. (निवडणुकीची कार्यवाही जुन्या कार्यकारी मंडळाकडून केली जाईल). निवडणुक होण्यापूर्वी एक महिना अगोदर सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयात प्रसिध्द केली जाईल. ज्या सभासदांनी त्यांची वर्गणीची रक्कम पूर्णपणे भरलेली आहे. असेच सभासद निवडणुकीत भाग घेण्यास पात्र ठरतील. समसमान मते पडल्यास अध्यक्ष आपल्या पसंतीचे मत (कास्टींग व्होट) देतील.

१२) **कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची रचना :-**

अ) अध्यक्ष :-

सभेचे कामकाज चालविणे व सभेचे स्थान स्विकारणे, संस्थेच्या हितसंबंधाने योग्य ते आदेश देणे, कार्यकारी मंडळाच्या तसेच सर्वसाधारण सभा आयोजित करणे. कार्यकारी मंडळाच्या विषयावर अथवा निर्णयावर समान मत तसेच एकमत झाल्यास एक ज्यादा मत देण्याचा अधिकार अध्यक्षास राहील. तसेच सेवकांवर देखरेख ठेवणे, त्यांच्या अडीअडचणी

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम | श्री. ज्ञानेश्वर तुकाराम कदम | श्री. पांडुरंग तुकाराम कदम |

Asst. Charity Commissioner
Pune



पाहुन त्यावर त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे व मदत करणे, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे, त्यांचा पगार ठरविणे हे अध्यक्षांचे कार्य राहील.

ब) **उपाध्यक्ष :-**

अध्यक्षांच्या अनुउपस्थितीत अध्याक्षांनी सर्व कामे व इतर वेळी अध्यक्षांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात मदत करणे.

क) सचिव :-

कार्यकारी मंडळाने पास केलेल्या ठरावाची अंमल बजावणी करणे, तसेच संस्थेच्या जमाखर्च सादर करणे, संस्थेचे पुर्ण पत्र व्यवहार, कारभार, कोर्ट कचेरीची कामे इ. कामे सचिव अध्यक्षांच्या सहमतीने पाहतील. सचिव हे अध्यक्षात वेळोवेळी संस्थेच्या कामात सहकार्य व मदत करतील.

ड ) **कोषाध्यक्ष :-**

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे, हिशोब लिहिणे, अगर लिहून देणे, हिशोब पूर्ण झाल्यावर अध्यक्षांसमोर ठेवणे हिशोबाच्या पुस्तकावरुन वार्षिक पत्रक तयार करणे, रक्कमेची देवाण घेवाण करणे, ऑडिटर यांनी हिशोब तपासुन काढलेल्या त्रुटींची पुर्तता करणे. व धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालयात सादर करणे.

इ) सदस्य :-

संस्थेच्या सर्व कामकाजात व कार्यात सहकार्य करणे, तसेच सर्व प्रकारच्या मिटींगला उपस्थित राहणे.

१३) **कार्यकारी मंडळाच्या सभा व मागणीच्या सभा :-**

कामाच्या आवश्यकतेनुसार कार्यकारी मंडळाच्या सभा घेतल्या जातील, साधारणतः वर्षातुन ३ कार्यकारी मंडळाच्या सभा घेतल्या जातील.

१४) **कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :-**

| | | |
|---|---|---|
| (Kadam) | (Kadam) | (P. T. Kadam) |
| अध्यक्ष | **उपाध्यक्ष** | **सचिव** |
| **श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम** | **श्री. ज्ञानेश्वर तुकाराम कदम** | **श्री. पांडुरंग तुकाराम कदम** |

कार्यकारी मंडळाच्या सभेची नोटीस सात दिवसापुर्वी रजिस्टर पोस्टानी अथवा समक्ष बजावून पाठविले पाहिजे व सदर सभेत एकूण १/५ सभासदांचा कोरम राहील. कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास पुन्हा अर्ध्या तासाने ती सभा तेथेच भरेल. नंतर त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही. मात्र नोटीमध्ये तसा उल्लेख असणे आवश्यक आहे.

१५) **कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम :-**

संस्थेच्या कार्यकारी मंडळाची मुदत ३ वर्षे राहील. दर ३ वर्षांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत नवीन कार्यकारीणीच निवड केली जाईल. ज्या वर्षी निवडणुक असेल त्या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीसीमध्ये तसा स्पष्ट उल्लेख करण्यात येईल. नोटीस एक महिना अगोदर प्रसिध्द केली जाईल. नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्यात उमेदवारी अर्ज मागविणे, त्यांची छाननी करणे इ. बाबी पूर्ण केल्या जातील. कार्यकारी मंडळाची निवडणुक वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांमधून गुप्त मतदान पध्दतीने होईल. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष हेच निवडणुक अधिकारी म्हणून काम पाहतील व निवडणुकीचा निकाल जाहीर करतील

१६) **कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरणेबाबत.**

मृत्यु, राजीनामा अगर इतर कारणाने कार्यकारी मंडळातील पद रिक्त झाल्यास त्या जागी तात्पुरती अध्यक्षांची नेमणुक करतील व नंतर कार्यकारी मंडळातील राहिलेले अन्य सदस्य बहुमताने भरतील व तसा बदल अर्ज विहित नमुन्यात मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त सो. पुणे क्षेत्र यांना सादर करतील.

१७) **सभासदांचे हक्क व कर्तव्ये :-**

अ) **सभासदांचे हक्क :-**

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम | श्री. ज्ञानेश्वर तुकाराम कदम | श्री. पांडुरंग तुकाराम कदम |

सर्व सभासदांना संस्थेच्या सर्वसाधारण सभेस उपस्थित राहून चर्चा करण्याचा अधिकार राहील व संस्थेच्या वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होता येईल. तसेच लेखी सूचना, तक्रारी व दाद मागण्याचा अधिकार राहील. संस्थेच्या सभासदांना कमीत कमी २/३ त्यापेक्षा जास्त सभासदांच्या संख्येने तातडीच्या सभा बोलविण्याचा हक्क राहील.

१८) **कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्य :-**

१. संस्थेचे कार्यकारी मंडळ हे संस्थेच्या सर्व कामकाजावर व कार्यालयावर नियंत्रण ठेवतील.

२. संस्थेच्या जमाखर्चास मान्यता देणे तसेच अंदाजपत्रक सादर करणे.

३. उद्देश पूर्तीसाठी आवश्यक ते किरकोळ नियम तयार करणे.

४. आवश्यकतेनुसार कर्मचारी वर्ग नेमणे, कमी करणे, तसेच कर्मचाऱ्यांचा पगार ठरविणे.

५. संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी स्थावर व जंगम मालमत्ता खरेदी विक्री करणे, देणगी घेणे, बक्षीसपत्र करुन घेणे.

६. संस्थेच्या सर्व कायदेशीर बाबी पुर्ण करणे.

७. संस्थेच्या स्थावर व जंगम मालमत्तेचे रक्षण करणे.

१९) **संस्थेचा निधी, मिळकत व विनियोग :-**

१) संस्थेच्या उद्देशांच्या पुर्तेसाठी सभासद वर्गणी, देणग्या, खाजगी व्यक्तीकडून तसेच शासकीय व निमशासकीय अनुदानाने, याद्वारे मिळणारे उत्पन्न ह्या सर्व रकमा हा संस्थेचा निधी समजण्यात येईल.

२) तसेच देणगी रुपाने करार, खरेदी व अन्य मार्गाने मिळणारी स्थावर मालमत्ता व जंगम मालमत्ता संस्थेची मिळकत समजण्यात येईल. वरील

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम | श्री. ज्ञानेश्वर तुकाराम कदम | श्री. पांडुरंग तुकाराम कदम |

मिळणारी रक्कम संस्थेच्या उद्देश पुर्तीसाठी संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा पगार व इतर दैनंदिन गरजेसाठी वापरली जाईल.

२०) **उद्दीष्ठ निहाय खर्चाची तरतुद :-** संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी संस्थेच्या एकूण उत्पन्नातून उद्दीष्ठनिहाय खर्चाची तरतुद पुढील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| ज्ञापनातील उद्दीष्टांसाठी | ८०% |
| व्यवस्थापकीय उद्दीष्टांसाठी | २०% |

२१) **बँक खाते :-**

कार्यकारी मंडळाच्या ठरावानुसार मान्यताप्राप्त बँकेत संस्थेच्या नावे बँकेत खाते उघडण्यात येईल व बँक खात्यावरील पैसे काढण्याचे अधिकार संस्थेचे अध्यक्ष आणि सचिव व कोषाध्यक्ष या दोघांपैकी एक अशा संयुक्त सहीने बँक खात्यावरील पैसे काढता येतील.

२२) कर्ज किंवा **ठेवी** यासंबंधीची तरतुद :-

**कर्ज** :- संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी आवश्यकता भासल्यास कोणत्याही व्यक्तीकडून, मान्यता प्राप्त बँकेकडून संस्थेला कर्ज घेता येईल. मात्र कर्ज घेण्यासाठी मुंबई सार्वजनिक कार्यकारी व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदीशी अधीन राहून मा. धर्मादाय सहआयुक्त पुणे विभाग, पुणे यांच्या पूर्व परवानगीने सदरील कर्जे घेता येईल.

**ठेवी** :- संस्थेच्या उद्देशाची पुर्तता करुन उरलेली सर्व रक्कम ही मुंबई सार्वजनिक कार्यकारी व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदींशी अधीन राहून सदरील संस्थेची रोखीची गुंतवणूक करण्यात येईल.

२३) स्थावर मालमत्तेची विक्री करण्यासाठी तरतुद :-

संस्थेच्या मालकीची स्थावर मालमत्ता विक्री करावयाची असल्यास मुंबई सार्वजनिक कार्यकारी व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदीशी अधीन

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| **श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम** | **श्री. ज्ञानेश्वर तुकाराम कदम** | **श्री. पांडुरंग तुकाराम कदम** |

राहून मा. धर्मादायक सह आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्या पुर्व परवानगीनेच सदरील संस्थेची स्थावर मालमत्ता विक्री करता येईल.

२४) **नियम व नियमावलीमध्ये बदल करण्याची तरतुद :-**

संस्था डिडमध्ये सुधारणा अथवा कोणत्याही कलमामध्ये दुरुस्ती अथवा बदल करावयाचा असल्यास संस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये ३/४ बहुमताने सदरील बदल करण्यात येईल.

२५) नाव आणि उद्देशात बदल :-

संस्थेचे नाव अथवा काही बदल करावयाचा असेल अथवा दोन संस्थांचे विलीनकरण करावयाचे असेल तर सन १८६० च्या संस्था कायदयातील कलम १२ किंवा १२अ यातील असणाऱ्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

२६) सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत :-

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियम कलम १५ अनुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी १९७१ च्या संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम १५ प्रमाणे अनुसुची सहाचे नमुन्यात ठेवण्यात येईल. १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ४ प्रमाणे व १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ७ प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसुची एकत्र नमुन्यात आपले विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकाचे कार्यालयातील पाठवावी लागेल.

२७) संस्थेची उत्पन्नाची साधने :-

१. संस्थेच्या निधीमधून येणारे व्याज

२. संस्थेला मिळणारी देणगी तसेच स्थानिक स्तरावर, संस्थेकडून मिळणारी देणगी, शासकीय अनुदान इ.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम | श्री. ज्ञानेश्वर तुकाराम कदम | श्री. पांडुरंग तुकाराम कदम |

२८) **संस्थेचे विसर्जन** :- सदरील संस्था विसर्जीत करावयाचा असल्यास सर्वसाधारण सभेमध्ये ३/५ कार्यकारी मंडळाच्या बहुमताने संस्थेची अस्तित्वात असलेली सर्व स्थावर व जंगम मालमत्ता तसे उद्देश असलेल्या संस्थेस दान तसेच संस्था सर्व देणी देऊन सदरील संस्था विसर्जीत करता येईल. संस्था नोंदणी सन १९६० चे अधिनियम कलम १३ व १४ प्रमाणे संस्था विसर्जनाची कारवाई करण्यात येईल.

## दाखला

असे प्रमाणित करण्यात येते की, **श्रीनाथ म्हस्कोबा** देवस्थान ट्रस्ट, **पिलाणवाडी, दौंड,** या संस्थेच्या नियम व नियमावलीची खरी व सत्यप्रत आहे.

स्थळ : पुणे

दिनांक : 23/8/2011.

अध्यक्ष

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| श्री. लक्ष्मण पांडुरंग कदम | श्री. ज्ञानेश्वर तुकाराम कदम | श्री. पांडुरंग तुकाराम कदम |